MHSN090005672021

**नियमित दिवाणी मुकदमा क्र.९२/२०२१ मधील नि.क्र.१३ खालील आदेश**
**(श्री.विजय पाटील *विरुध्द* श्री. उदय पाटील)**

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचेविरुध्द कलम १५१ प्रमाणे ताकीद मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत वादीने प्रतिवादी विरुध्द मा.न्यायालयात जाहीर ठरावाचा व तत्परिणामी फल म्हणुन हक्क शाबीतीचा, निरंतर ताकीदीचा व नुकसान भरपाईचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत म्हणजे जमिन गट नं.१५४२/ब या जमिनीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे वडीलांनी १५ वर्षापुर्वी मा.गावकांगार तलाठी यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सदर गटातील आठ आणे- आठ आणे हिस्सा वादी व प्रतिवादीला देऊन त्याची ७/१२ सदरी नावे लावुन सदर जमिन पुर्व-पश्चिम चालीत वाटलेली आहे. सदर जमिनीत वादी व प्रतिवादी यांचे गटाचे पश्चिम बाजूस सध्या वापरत असलेल्या जमिनीचे कॅनॉल शेजारी मध्यभागी विहिर आहे. सदर विहिरीची नोंद ७/१२ सदरी आहे. सदर विहिरीमध्ये मोठया प्रमाणात गाळ साचला असुन सदर गाळ काढण्यासाठी वादी हे गेल्या ४ वर्षापासुन प्रतिवादी यांना विनंती करत आहेत, परंतु प्रतिवादी त्यामध्ये कोणताही प्रतिसाद देत नाही. म्हणुन वादींनी प्रतिवादींना सदर विहिरीतील गाळ काढण्यासाठी व पाईपलाईन करण्यासाठी आर्धा आर्धा खर्च घालुया तसे शक्य नसल्यास सदरची विहिर तुम्ही घ्यावी व मला नवीन विहिर पाडण्यासाठी पैसे द्यावे, त्यासही तुम्ही तयार नसाल तर मी सदरची समाईक विहिर घेतो व तुम्हाला नवीन विहिर पाडण्यासाठी पैसे देतो, अशी वादींनी प्रतिवादी यांना विनंती केली होती. परंतु, प्रतिवादीने वादीच्या मागणीस व विनंतीस कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. वादी गट नं.१५४२/ब या गटामधील त्यांना वाटुन आलेल्या आर्ध्या हिस्स्यामध्ये द्राक्ष बागेची लागन करणार आहे. परंतु, सदर पिकास पाण्याची गरज असल्याने ते सदर विहिरीत गाळ स्वखर्चाने काढुन पाणी साठवण्याची

व्यवस्था करणार आहेत. परंतु, प्रतिवादी त्यांना गाळ काढण्यासाठी हरकत व अडथळा करत आहेत. त्यामुळे या वादीचे खुपे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. म्हणुन वादींना सदर विहिरीतील गाळ काढण्यासाठी केलेल्या खर्चातील अर्धा खर्च प्रतिवादी यांनी वादींना देणेबाबत आदेश करणेत यावे अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादीने निशाणी १८ कडे आपले म्हणणे दाखल करुन ताकीद अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी यांनी सदरचे गट नं.१५४२/ब मधील विहिर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतुन खोदलेली आहे. तसेच सदरची विहिर जमिनीपासुन ५ फुठापर्यंत पुर्णपणे बांधीव अशी आहे. सदरच्या विहिरीत कोणत्याहीप्रकारे गाळ माती जाणेचा कोणताही प्रश्न आजपर्यंत निर्माण झालेला नाही. तसेच, सदरचे विहिरीमध्ये सध्या जमिन लेव्हलच्या ४ ते ५ फुठ अंतरापर्यंत पाणी असुन त्याचे वरती जवळ पास १० ते १५ एकर जमिन ओलीताखाली पिकू शकते. यातील वादी यांनी त्यांचे क्षेत्रास त्याच विहिरीतुन पाणी आजपर्यंत घेऊन जात आहेत. वादी यांचे स्वतंत्र पाईपलाईन आहे. वादी हे स्वतः कोणतेही कष्ट न करता प्रतिवादी यांचे कष्टातुन खोदलेल्या विहिरीतुन पाणी आजपर्यंत घेऊन जात आहेत. वादी हे सदर विहिरीवरती बेकायदेशीर कब्जा करणेच्या हेतुने मा.न्यायालयात सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. वादीने विहिरीमध्ये गाळ साचला असलेबाबत, तसेच विहिरीमध्ये पाणी नसले बाबत कोणताही पुरावा पटलावर हजर केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्यातील परस्परविरोधी कथनांचा विचार करता, नि.१३ चे अर्जाच्या अंतिम निष्कर्षास येण्याकरिता खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचाराधीन निर्माण झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेतः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | नकारार्थी |
| २ | वादीने अनुकूलतेचा कल त्याच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३ | वादीने तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ४ | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो |

५. वादीने आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. नि.६ कडे गट नं.१५४२/ब चा ७/१२ खाते उतारा.

२. नि.७ कडे गट नं.४६५ चा ७/१२ उतारा.

३. नि.८ कडे गट नं.१५४२/ब वरील फेरफार क्र.३१६३ ची सहि शिक्का प्रत.

४. नि.२४/१ कडे वादीचे वडील विठ्ठल महादेव पाटील यांचे प्रतिज्ञापत्र.

५. नि.२४/२ कडे गट नं.१५४२/ब चा ७/१२ खाते उताऱ्याची झेरॉक्स प्रत.

६. प्रतिवादीने आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. नि.२७/४ व नि.२७/५ कडे वाद मिळकतीचे फोटो.

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता–**

७. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळणेसाठी ते एकत्रितरित्या विचारात घेतले आहेत.

८. वादी यांनी त्यांचे अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दावा गट नं.१५४२/ब या जमिनीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे वडीलांनी सुमारे १५ वर्षापुर्वी गांवकामगार तलाठी यांच्याकडे अर्ज देऊन वादी व प्रतिवादी यांच्या प्रत्येकी आठ आणे हिस्साची ७/१२ उतारे सदरी नावे लावुन घेतली आहे. असे असताना सदर जमिनीच्या

पश्चिम बाजुस केनॉल शेजारी मध्यभागी विहिरीमध्ये मोठयाप्रमाणात गाळ साचला आहे. सदरचा गाळ विहिरीतुन काढण्यासाठी व पाईपलाईन टाकण्याकरिता आर्धा–आर्धा खर्च घालण्याबाबत तसेच, जर तसे शक्य नसेल तर वादी यांना नवीन विहिर पाडण्यासाठी पैसे द्यावेत अशी वादीने प्रतिवादींना विनंती केली होती. वादी यांना गट नं.१५४२/ब मध्ये आर्ध्या हिस्स्यात द्राक्षबाग लावणी करिता पाणी आवश्यक आहे. म्हणुन, वादी यांनी प्रतिवादी यांना स्वखर्चाने गाळ काढुन घेण्याबाबत विनंती केली असता प्रतिवादी यांनी वादी यांना हरकत केली असल्याने वादी यांचे मोठयाप्रमाणात नुकसान झाले आहे.

९. याउलट प्रतिवादी यांनी असे अभिकथन केले आहे की, गट नं.१५४२/ब मधील विहिर प्रतिवादी यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेतुन काढलेली आहे व सदरची विहिर जमिनीपासुन ५ फुठापर्यंत बांधीव असल्याने त्यात कोणत्याहिप्रकारे गाळ माती जाणेचा प्रश्नच निर्माण होत नाही. सदरच्या विहिरीमध्ये जमिन लेव्हलच्या ४ ते ५ फुठ अंतरापर्यंत पाणी असुन त्याचेवर जवळपास १० ते १५ एकर जमिनीमध्ये ओलीताखाली पिकु शकते. सदर विहिरीमधुन वादी यांची स्वतंत्र पाईपलाईन होती व आहे तसेच वादी हे त्याच विहिरीतुन पाणी आजपर्यंत घेत आहेत. असे असताना वादी हे केवळ प्रतिवादी यांना त्रास देणेकरिता तसेच, विहिरीवरती बेकायदेशीर कब्जा करण्याकरिता सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे.

१०. वादी तर्फे वकील श्री. एम.एम.नदाफ यांनी असा युक्तीवाद केला आहे की, सदर विहिरीमध्ये वादी यांचा हिस्सा असल्याने वादी यांना विहिरीमधुन पाणी घेणेचा हक्क आहे. परंतु, सदर विहिरीत गाळ साठला असल्याने वादी यांना पाणी वापरता येत नसल्याने वादी यांचे नुकसान होत आहे. याउलट प्रतिवादीतर्फे वकील श्री. ए. बी. डांगे यांनी असा युक्तीवाद केला आहे की, सदर विहिरीतुन वादी हे आजतागायत पाणी घेत आहेत. तसेच, सदर विहिरीमध्ये गाळ असल्याबाबत वादी यांनी कोणताही पुरावा सदरचा दाव्यात दाखल केलेला नाही. वादी हे केवळ प्रतिवादी यांना नाहक त्रास देणेकरिता अशाप्रकारे मोघम स्वरुपाचा अर्ज दाखल केला आहे.

११. वादी यांनी फेरिस्त निशाणी क्र. ६ व फेरिस्त निशाणी क्र.२४/२ कडे गट

नं.१५४२/ब चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उताऱ्याचे अवलोकनावरुन असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांचा सदर मिळकतीमध्ये वेगवेगळी वहिवाट आहे तसेच, समाईकातील विहिरपड आहे. पुढे वादी यांनी निशाणी क्र. ८ कडे फेरफार क्र. ३१६३ चा उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन हि बाब स्पष्ट होते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये गट नं.१५४२/ब या मिळकतीचे वाटप झाले आहे. सदर मिळकतीमध्ये विठ्ठल महादेव पाटील यांच्या नावाचे वीज कनेक्शन असलेबाबतचे वादी यांनी फेरिस्त निशाणी क्र. २४/३ कडे म.रा.वि.वि. कंपनीचे कनेक्शन पावतीची झेरॉक्स प्रत दाखल केले आहे.

१२. सर्व प्रथम वादी यांनी त्याचे अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे विहिरीमध्ये गाळ आहे किंवा नाही हि बाब सिध्द करणे जरुरीचे आहे. सदरची बाब सिध्द करण्याकरिता वादी यांनी वरील कागदोपत्री पुराव्या व्यतिरिक्त इतर कोणतेही कागदोपत्री पुरावे दाखल केले नाहीत. वादी यांनी फेरिस्त निशाणी क्र. २४/१ कडे विठ्ठल महादेव पाटील वादीचे वडील यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. याउलट प्रतिवादी यांनी फेरिस्त नि.क्र.२७/४ व २७/५ कडे विहिरीचे छायाचित्र दाखल केले आहे. सदर छायाचित्राच्या अवलोकनावरुन असे दिसुन येते की, विहिर हि जमिनीपासुन ५ फुठापर्यंत बांधीव आहे. असे असताना विहिरीमध्ये गाळ जाण्याची शक्यता कमी असल्याचे स्पष्ट होते. सदर विहिरीमध्ये गाळ आहे किंवा नाही हि बाब वादी यांनी सकृतदर्शनी पुराव्याद्वारे सिध्द करणे जरुरीचे आहे. दुसरी महत्वाची बाब येथे अशी आहे कि, वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रकिया संहितेच्या कोणत्या कलमाखाली दाखल केले आहे हे सदर अर्जाच्या अवलोकनावरुन स्पष्ट होत नाही. सदर अर्जाचे स्वरुप पाहता वादी यांनी दाखल केलेला अर्ज मोघम स्वरुपाचा असल्याचे दिसुन येते. वादी यांनी त्यांची केस सकृतदर्शनी सिध्द केली नसल्यामुळे वादी यांचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

१३. वादी यांनी त्यांची केस सकृतदर्शनी सिध्द केली नसल्यामूळे अर्जात मागितल्याप्रमाणे मनाई हुकूम दिल्यास सदर आदेशाचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मी या निष्कर्षास येते की, वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस नसल्यामुळे अनुकुलतेचा कल हा वादीच्या बाजुने नाही. वर नमुद केल्याप्रमाणे वादीने

सकृतदर्शनी केस शाबीत केली नसल्यामुळे वादीच्या लाभात मनाई हुकूम दिला नाही तर वादीचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.४ चे उत्तराकरिता खालील आदेश पारीत करीत आहेः-

**आदेश**

वादीचा **नि.१३** कडील अर्ज नामंजूर करणेत येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला)

JYOTIMALA CHANDRASHEKHAR GUPTA

Digitally signed by JYOTIMALA CHANDRASHEKHAR GUPTA
Date: 2022.04.01 17:55:31 +0000

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**दि.३१.०३.२०२२** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**

**तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | D.S. Pawar |
| Court | : | 2nd Jt.C. J. J. D and J. M. F.C., Tasgaon. |
| Date | : | 31.03.2022 |
| Order signed by the Presiding officer on | : | 01.04.2022 |
| Order uploaded on | : | 01.04.2022 |